# कामगारनेते श्याम म्हात्रे यांच्य हस्ते खारघर जनसंपर्क कार्यालयाचे उद्घाटन .

पनवेल (प्रतिनिधी) कार्यसम्राट व लोकप्रिय आमदार प्रशांत ठाकूर यांच्या खारघर प्रभाग क्रमांक ४ (सेक्टर १८, १९, २०, २१) मधील जनसंपर्क कार्यालयाचा उद्घाटन सोहळा बुधवार दि.०७ मे रोजी सायंकाळी ०६.३० वाजता शॉप नं.९, हावरेज् स्प्लेंडर, प्लॉट नं.५६, सेक्टर २०, खारघर येथे महाराष्ट्र प्रदेश कॉंग्रेसच्या कामगार विभागाचे सरचिटणीस, कामगारनेते श्याम म्हात्रे यांच्या हस्ते व लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाला.

या सोहळयास आमदार प्रशांत ठाकूर, शिक्षण मंडळाचे सभापती तथा खारघर विभाग प्रभारी वाय्.टी.देशमुख, खारघर शहर कॉंग्रेस कमिटीचे अध्यक्ष अनंता तोडेकर, राम पंडीत, नरेश तोडेकर, नाना घरत, रूपाली जैन, जे.पी.खारगे, ॲड.रविंद्र नागरगोजे, ओवे उपसरपंच साजिद पटेल, रईस पटेल, अल्पसंख्यांक सेलचे तालुका अध्यक्ष मनसुर पटेल, खारघर प्रभाग चारचे अध्यक्ष मोहन सावरकर, सरचिटणीस नितीन भगत, त्रेवोर पिंटो, अमनदिप सिंग, तालुका सरचिटणीस दिनेश शिरसाठ, रामदास नारकर, रघुनाथ ठाकूर, राजगुरू चंद्रात्रे, विनोद ठाकूर, दत्ता वर्तेकर, किर्ती नवघरे, संजय कंधारे, कुलमित सिंग विर्क, शत्रुघ्न काकडे, जसविंरदसिंग सैनी, खारघर महिला अध्यक्षा निलम खैरनार, कल्पना मोरे, सुधा नायक, इंदरपाल सिंग, गौरव तांबे, गुरूनाथ ठाकूर, मनमोहन सिंग आदी मान्यवर उपस्थित होते.

या वेळी काशीब मिर्झा, झाहिद सय्यद, राहुल अहिर, कल्पेश वाघ, रोहित गांगल, आशितोष धाडवे या युवा कार्यकर्त्यांनी मान्यवरांच्या उपस्थितीत पक्ष प्रवेश केला. त्यांचे कॉंग्रेस पक्षात पुष्पगुच्छ देवून स्वागत करण्यात आले. या कार्यक्रमास खारघर वसाहतीमधील पदाधिकारी व कार्यकर्ते मोठया संख्येने उपस्थित होते.

दिवसेंदिवस खारघरमधील समस्या वाढत आहेत त्यामुळे तेथील अडचणी आणि मुलभूत प्रश्नांची सोडवणूक करण्यासाठी अशा प्रकारच्या जनसंपर्क कार्यालयाची गरज भासत होती. ही निकड लक्षात घेवून येथे जनसंपर्क कार्यालय सुरू करण्यात येत आहे. या माध्यमातुन खारघरमधील जनतेशी संपर्क ठेवून दर १५ दिवसांत कार्यालयातील कामकाजाचा आढावा घेतला जाईल. **- लोकनेते रामशेठ ठाकूर**

खारघर भागात विविध प्रांतातून आलेले लोक राहतात त्यामुळे त्यांच्या गरजाही वेगवेगळया आहेत त्यांच्या समस्या सोडविण्यासाठी कॉंग्रेस पक्षाच्या माध्यमातुन व लोकनेते रामशेठ ठाकूर तसेच आमदार प्रशांत ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली या जनसंपर्क कार्यालयातून येथील नागरीकांना सहकार्य मिळणार आहे. खारघर मधील हे कार्यालय केवळ कॉंग्रेसचे जनसंपर्क कार्यालय राहणार नसून ते एक मदतकार्य पुरविणारे सुविधा केंद्रच असेल.

**- कामगार नेते श्याम म्हात्रे**

खारघरमधील जनतेच्या मागण्या प्रशासनाकडे मांडण्याकरीता या जनसंपर्क कार्यालयाचा उपयोग केला जाईल. या कार्यालयातून खारघर परिसरातील नागरीकांची सर्वतोपरी सेवा केली जाईल. शासनाने राबविलेल्या योजनांची माहिती येथुन पुरविली जाईल. **- आमदार प्रशांत ठाकूर**

येथील जनतेशी अधिकाधिक संपर्क साधण्यासाठी या कार्यालयाचा उपयोग कार्यकर्त्यांनी करावा. जनसंपर्क वाढवून जनतेच्या समस्या सोडविण्यासाठी कार्यकर्त्यांनी पुढाकार घ्यावा.

**- खारघर प्रभारी वाय.टी.देशमुख**